# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# पाणी पुरवठा विभाग, सांगली

**जा.प्र.क्र.07/2020-2021 साठी शुध्दीपत्रक**

सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग, सांगली कडील कामासाठी जाहीर प्रकटन क्र.07/2020-2021 निविदा मागविणेकामी www.smkc.gov.in या वेबसाईट प्रसिध्दी देण्यात आली होती.

सदर कामांसाठी निविदा विक्री व स्विकारणे मुदत प्रसिध्दीपासुन दिनांक 17/06/2020 दुपारी 4.00 वाजेपर्यत होती.

तरी सदर कामांना मुळ प्रसिध्दीमध्ये शुन्य / अल्प प्रतिसाद मिळाल्याने www.smkc.gov.in या वेवसाईटव्दारे मुदतवाढ देणेत येत आहे.

i) **निविदा विक्री व स्विकारणे - निविदा मुदतवाढ प्रसिध्दीपासुन दिनांक 24/06/2020 दुपारी 04.00 वाजेपर्यंत राहील.**

Ii) **निविदा उघडणे - दिनांक 25/06/2020 रोजी दुपारी 4.00 वाजता निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.**

93
17/6/2020

*Sd/-*
**(आर.जी.रजपूत)**
**पाणी पुरवठा अभियंता**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग , सांगली

### जाहीर प्रकटन क्र. ०७ /२०२०-२१

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे खालील कामगिरीसाठी कोणत्याही शासकीय विभागकडील मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र असलेले मक्तेदार यांना निविदा पध्दतीनुसार मनपाच्या अधिकृत www.smkc.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे तपशिल | अंदाजित खर्च | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा फॉर्म | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टेबल ब्लिचिंग पावडर आय.एस.आय. स्पेसिफिकेशन क्र. १०६५/१९८९ ग्रेड फर्स्टनुसार आय.एस.आय.मार्क व ३३% क्लोरीन असणे आवश्यक ०९ मे.टन पुरवठा करणे. | २,८८,०००/- | २,८८०/- | १४,४००/- | ५५०/- | १० दिवस |

**टिप:-**

१.वरील कामासाठी बयाणा निविदा रक्कमेच्या १% व सुरक्षा अनामत निविदा रक्कमेच्या ५% राहील.

२.निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण www.smkc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहिल.

३. संपुर्ण निविदा प्रक्रिया, अर्ज विक्री सादरीकरण व स्विकृती www.smkc.gov.in द्वारे कार्यरत राहील.

४. निविदा बाबत आधिक माहिती खालील प्रमाणे आहे.काम क्र. १

१) निविदा विक्री व स्विकारणे - निविदा प्रसिध्दी पासुन दि. १७ / ०६ /२०२० दु. ०४.०० वाजे पर्यत राहील.

२) निविदा उघडणे - दि .१८ / ०६ /२०२० रोजी दु. ४.०० वा. निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.

५. सा.मि.कु.मनपाकडील नोंदणीकृत मक्तेदार असणे आवश्यक आहे. ही अट शिथिल करणेत येत असून या कामी कोणत्याही शासकीय विभागाकडील मक्तेदार नोदणी प्रमाणपत्र सादर करावे. निविदा मंजुर झाल्यास कार्यारंभ मनपाची योग्या फि भरुन ती नोंदणी करुन घेणे पात्र निविदा धारकास बंधनकारक राहिल.

६. निविदा प्रक्रिया बाबत अधिक माहिती www.smkc.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध राहिल.

७. कोणतीही एक निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचा अधिकार महानगरपालिकेने राखुण ठेवला आहे.

८. उक्त निविदेसाठी शुध्दीपत्रक व मुदतवाढ द्यावी लागलेस ती www.smkc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. या बाबत दैनिक वृत्तपत्रामध्ये कोणतेही प्रसिध्द देण्यात येणार नाही.

11.6

(आर.जी. रजपुत)
पाणी पुरवठा अभियंता
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर म.न.पा.
पाणी पुरवठा विभाग

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
# पाणी पुरवठा विभाग,सांगली.

## ॲबस्ट्रॅक्ट

**कामाचे नावः**- सन २०२०-२१ सालात पाणी पुरवठा विभागाकडे ०९ मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करणे.

| क्वॉंटीटी | युनिट | तपशिल | दर GST सहीत | प्रत्येकी | एस्टीमेट रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०९ | मे.टन | ब्लिचिंग पावडर (टि.सी.एल)आय.एस. क्र.१०६५:१९८९ ग्रेड-१ आय.एस. आय. मार्क ३३% क्लोरीन आवश्यक. | ३२,०००/- | मे.टन | २,८८,०००/- |

(आर.जी. रजपुत)
पाणी पुरवठा अभियंता,
सां.मि.आणि कु. शहर महानगरपालिका
पाणी पुरवठा विभाग सांगली.

# सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
# पाणी पुरवठा विभाग

## निविदा, शर्ती व अटी

१) निविदा दोन लिफाफा पध्दतीने देणेचे आहेत.

अ) नंबर १ च्या लिफाफ्यामध्ये खालीलप्रमाणे कागदपत्रे असावीत.

१) बयाणा रक्कमेचे चलन.

२) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.

३) मक्तेदार नोंदणी व परवाने प्रमाणपत्र.

४) ब्लिचिंग पावडर पुरवठा केलेल्या कामाचा अनुभव दाखला.

महाराष्ट्र शासन परिपत्रक जी.एस.टी/प्रक्र८९/कराधान-१दि.१९/८/२०१७ यामधील नमुद मार्गदर्शक सुचनानुसार जी.एस.टीची अमंलबजावणी दि.१ जुलै २०१७ पासुन सुरु केलेने जी.एस.टी. अधिनियमानुसार कराच्या आकारणी होणार असलेले त्या बाबत जी.एस.टी च्या कराच्या बोजाचा विचार करुन निविदा दर भरुन सादर करणेचा आहे. तसेच त्या जी.एस.टी बाबत शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निदेशानुसार व जी.एस.टी नोंदणी प्रमाणपत्र दि. १९/८/२०१७ चे व त्या पुढील वेळोवेळी प्राप्त निदेशानुसार आवश्यक सर्व कार्यवाही मक्तेदारावर बंधनकारक राहिल. निविदा फॉर्म फि बयाणामहानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे (मुख्यालय) रोखीने /बँकेकडी खाते क्र. ४२४२०२०१०५०२७०८ येथे भरणेचा असुन निविदेची सर्व प्रक्रिया www.smkc.gov.in या वेबसाईट द्वारे ऑनलाईन पध्दतीने होईल.

२) माल पुरवठ्याबाबत शर्ती:-

स्टेबल ब्लिचिंग पावडर:- टी.सी.एल आय.एस.आय.स्पेसिफिकेशन क्र. १०६५/१९८९ ग्रेड फर्स्टनुसार आय.एस.आय.मार्क व ३३% क्लोरीन असणे आवश्यक.

सदर कामाचा करारनामा संम्मत झालेपासुन एक वर्ष कालावधीसाठी उक्त तपशिलाप्रमाणे महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी देण्यात येणाऱ्या ऑर्डर प्रमाणे मलाचा पुरवठा करावयाचा आहे. पुर्णत: माल पुरवठ्याची मुदत दि. १० दिवस असे राहील.

३) कोणतीही निविदा मंजूर अथवा ना मंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुल्लासा केला जाणार नाही.

४) बयाणा रक्कम निविदा रक्कमेच्या १% महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडे (मुख्यालय) रोखीने /बँकेकडी खाते क्र. ४२४२०२०१०५०२७०८ वर भरणेचा आहे.

५)वरील कामासाठी अंदाजपत्रकामध्ये नमुद केलेल्या साठ्यांचा पुरवठा ठरवून दिलेल्या वर्णनानुसार / दरानुसार करणे बंधनकारक राहिल.

६) एस्टिमेंटमध्ये अगर प्रसिध्दीकरणामध्ये नमुद असलेल्या मालाचे परिमान अंदाजित असून प्रत्येक्ष पुरवठा केलेल्य मालाच्या परिमानानुसार बिल केले जाईल.

७) स्पेसिफिकेशन प्रमाणे पाणी पुरवठा अंभियंता, वेळोवेळी आदेश करतील त्याप्रमाणे व पध्दतीने पुरवठा पुर्ण करणेचा आहे.

८) माल पुरवठ्याच्या परिमाणामध्ये घट अगर वाढ करणेचा अधिकार महानगरपालिकेने राहून ठेवलेला आहे. पुरवठा दाराने सदरचा माल मंजूर दराप्रमाणे करण्याचा आहे.

९) मालाच्या गुणवत्ते बद्दल जर कोणत्याही नागरिकांनी, ठेकेदारांनी, मा. सदस्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी तक्रार केलेस/ हरकत घेतलेस त्याची पुर्णत: जबाबदारी पुरवठादार यांच्यावर राहिल.

१०) स्पेसिफिकेशन प्रमाणे मालाचा पुरवठा झाला नाही. असे पाणी पुरवठा अभियंता/वॉटर वर्क्स इंजि. यांचे निदर्शनास आल्यास वॉटर वर्क्स इंजि. यांची तशी खात्री झाल्यास पुरवठा दारास नोटीस कळवून स्पेसिफिकेशन प्रमाणे मालाचा पुरवठा करणेबाबत कळविले जाईल. तेव्हा पुरवठा दाराने स्व खर्चाने

नाकारलेल्या माल घेवून जावून स्पेसिफिकेशन प्रमाणे मालाचा पुरवठा तातडीने करणेचा आहे. तसे पुरवठादाराने न केल्यास पाणी पुरवठा अभियंता यांनी जे दंडाची कार्यवाही करतील त्यास पुरवठादार जबाबदार राहील व त्यांना मान्य करणे बंधन कारक आहे.

११) बिल होण्या पुर्वी पुराने, अपघाताने किंवा दुसऱ्या कोणत्याही अकस्मिक कारणाने मालाचे नुकसान झ्ााल्यास त्याची जबाबदारी पुरवठादारावर राहील, पुन्हा मालाचा पुरवठादारास स्व खर्चाने पुरवठा करणे भाग पडेल.

१२) कोणत्याही कारणासाठी महापालिकेच्या परवानगी शिवाय माल पुरवठ्याचे काम पुरवठादारास दुसऱ्यास तबदीर करता येणार नाही.

१३) मालाचा पुरवठा करते वेळी सर्व प्रकारचे शासकीय कर वगैरे पुरवठादाराने अदा करायचे आहे.

१४) एकाद्या फर्मच्या भागीदाराने टेंडर दिले असल्यास फर्मच्या घटनेतील कोणतेही बदल पुरवठादाराने ताबडतोब महापालिकेस कळविणे बंधनकारक राहील.

१५) महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मुदतीत काम पूर्ण झाले नाही तर दंडाची आकारणी खालीलप्रमाणे केली जाईल.

१ अंदाजपत्रकिय रक्कम रुपये ३०००/- मात्रच्या कामास दर दिवसास रुपये १०/- (दहा).

१४ अंदाजपत्रकिय रक्कम रुपये ३००१/- ते १०,०००/- मात्रच्या कामास दर दिवसास रुपये २०/- (विस)

१५अंदाजपत्रकिय रक्कम रुपये १०,००१/- ते २५,०००/- मात्रच्या कामास दर दिवसास रुपये ४०/- (चाळीस)

१६अंदाजपत्रकिय रक्कम रुपये २५,००१/- ते १,००,०००/- मात्रच्या कामास दर दिवसास रुपये ६०/- (साठ)

१७ अंदाजपत्रकिय रक्कम रुपये १ लाख ते ५ लाख मात्रच्या कामास दर दिवसास रुपये ५००/- (पाचशे)
अंदाजपत्रकिय रक्कम रुपये ५ लाख पेक्षा अधिक रक्कमेच्या कामास दर दिवसास रुपये १०००/-(एक हजार) प्रमाणे दंडाची रक्कम बिलातून वसुल करणेत येईल.

१६) कोणत्याही कारणास्तव ॲडव्हान्स दिला जाणार नाही.

१७) एकाद्या फर्म कडून जेव्हा टेंडर दिले जाते तेव्हा ते फर्मच्या प्रत्येक भागीदाराने सही करुन दिले पाहीजे. एकाद्या भागीदार हजर नसल्यास त्या वेळी त्याच्या तर्फे अधिकार (ऑथॉरेटी) असलेल्या कोणत्याही इसमास सही करुन देता येईल.

१८) ज्याचे टेंडर मंजूर होईल त्याला मंजूर झालेचे समज मिळाल्या पासून सहा दिवसाच्या आत किंवा दुसरी अंतिम समज चार दिवसाच्या मुदतीत दिल्या पासून मंजूर दराप्रमाणे होणाऱ्या रक्कमेच्या ५% रक्कम सुरक्षा अनामत म्हणून रोखीने भरली पाहीजे आणि योग्य रक्कमेच्या स्टॅम्प पेपरसह करारपत्र पुर्ण करुन दिले पाहिजे.

१९) निविदा ई- टेंडर व्दारे सादर केल्यानंतर त्याबाबत कसलाही खुल्लासा किंवा सबब ऐकली जाणार नाही व त्याचा विचार ही केला जाणार नाही.

२०) मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याच दिवशी संबंधीत विभागाकडे कळविणेचे आहे.

२१) टेंडर मालाचे दर शाब्दीक अकड्यात दिली पाहिजे. चिर फाड झालेल्या काडाकोड जालेल्या सही नसलेल्या अगर नियमास अनुसरुन, नसलेले टेंडर विचारात घेतले जाणार नाही.

२२) ब्लिचींग पावडर, पी.ए.सी. पावडर या मालाचा पुरवठा झाल्यानंतर प्रत्येक लोडमधील बॅंच नं.मधील मालाचा नमुना घेणेत येईल व तो माल आय.एस.आय स्पेसिफिकेशन प्रमाणे आहे अगर कसे? व दरजेदार मालाचा पुरवठा झाला आहे याचीपडताळणी करण्यासाठी (अ) मा. कनिष्ठ वैद्यानिक जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा,सांगली यांच्याकडे पाठवण्यात येईल.

२३)पुरवठा केलेली ब्लिचींग पावडर पाणी शुध्दीकरणासाठी वापरणेस हानिकार नसलेची खात्री होण्यासाठी आवश्यकता वाटलेस कार्यकारी अभियंता, खाजगी/ व मान्यता प्राप्त संस्थेकडून तपासणी करणेत येईल. त्याचा खर्च पुरवठादार यांनी करायचा आहे.

२४) मालाचा पुरवठा इकडील सुचणे प्रमाणे हिराबाग जलशुध्दीकरण केंद्र सांगली, माळबंगला जलशुध्दीकरण केंद्र सांगली व मिरज जलशुध्दीकरण केंद्र मिरजकडे करण्याचा आहे.

२५) प्रत्येक मालाचा पुरवठा करण्या पुर्वी या जलशुध्दीकरण केंद्रामधील जागेची पहाणी पुरवठादार यांनी करावी व जेथे कार्यालयान जागा निश्चीत केली असेल ती जागा सुरक्षीत असेल अशाच ठिकाणी माल ठेवणेचा आहे. यासाठी कोणतेही वाढीव खर्च पुरवठादार यांना देता येणार नाही.

२६) मालाचा पुरवठा पुरवठादार यांना आदेशाप्रमाणे पुरवठा करणेचे आदेश देण्यात येतील. यांचेही पुरवठादार यांनी कोणतीही अट न घालता मालाचा पुरवठा करणेचा आहे. यावेळी ठराविक इतक्या टनाचा पुरवठा आदेश दिला तरच पुरवठा करण्यात येईल अशी कोणतेही अटी मान्य करता येणार नाही.

२७) मालाचा पुरवठा दरजेदार झालेची खात्री वरील दाखल्यावरुन झालेनंतरच मालाचे देयके अदा करणेसाठी पाठवण्यात येईल. सदरचे दाखले संबंधीत अभियंते यांचेकडून प्रमाणीत करुन आठ दिवसात सादर करणे बंधनकारक राहील. प्रत्यक्ष माल पुरवठा झाला त्या दिवशी लगेच (सुट्टीचा दिवस सोडून) मालाचा नमुना संबंधीत दोन्ही यंत्रणेकडे पाठविणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

२८) कायम स्वरुपी बयाणा रक्कम विचारात घेतली जाणार नाही.

२९) मक्तेदार /पुरवठादार यांना पॅन नं. आवश्यक आहे. तसेच काम पुर्ण झालेनंतर कामाच्या बिला सोबत मक्तेदार यांनी पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

३०) मक्तेदार यांनी बिल जी.एस.टी. नं. सह सादर करण्याचा आहे.

३१) पुरवठादारास बिल मिळण्यास उशीर झाला तरी मालाचा पुरवठा वेळोवेळी पाणी पुरवठ्याकडे करणेचा आहे. अन्यथा पुरवठ्यादाराने मालाचा पुरवठा केला नाही तर त्यांचे नाव काळ्या यादीमध्ये समाविष्ठ करणेत येईल, यासाठी कोणतीही बाब न्याय प्रविष्ठ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३२) सदर निविदामधील परिमाण कोठे व केव्हा पुरवठा करावयाचा त्याचा स्वतंत्र आदेश कार्यकारी अभियंता हे वेळोवेळी देतील.

३३) सर्व प्रकारचे शासकीय कर वगैरे तसेच वेळोवेळी लागू होणारे कर मक्तेदार यांनी भरणे बंधनकारक राहील. तसेच जुलै २०१७ पासून लागू झालेप्रमाणे जी.एस.टी. मक्तेदार यांनी भरणे आवश्यक आहे.

३४) **परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीट -**

a) परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम खालील प्रमाणे राहिल.

(vii) निविदा भरले निविदाधरकाचा दर हा अंदाजपत्रकिय दराच्या किंमतीपेक्षा १० % पर्यंत कमी असेल तर निविदा धारकांने निविदाधीन किंमतीच्या १ % तसेच

(viii) निविदा भरले निविदाधारकाचा दर हा अंदापत्रकिय दराच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत जास्त दराने असेल तर अंदाजपत्रकिय दराच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढी रक्कम व बाब क्र. (i) प्रमाणे येणारी रक्कम मिळून एकूण रक्कम राहिल. ( उदा = १४% कमी दर - १०% पर्यंत करीता १% व १४% १०% -४% मिळून एकुण [ ( १% +४% )-५%]

b) परफॉरमन्स सिक्युरिटी डिपॉझीटची रक्कम आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका याचे नांवे डी.डी. (धनाकर्ष ) च्या स्वरुपात देणेची आहे.

c) सदरचा मूळ डी. डी. (धनाकर्ष ) स्कॅन करुन निविदा दराच्या दुसऱ्या लिफाफ्या सोबत सादर करणेचा
आहे. तसेच मूळे डी.डी. ( धनाकर्ष ) पाणी पुरवठा विभागाकडे कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये जाहिर
प्रकटन क्रमांक / वर्ष, कामाचे नांव व अ. क्रं. नमूद करुन निविदा भरलेच्या तारखेपासून पाच दिवसात
देणेचा आहे.

(d) सदर मूळ डी.डी. (धनाकर्ष ) उक्तप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झला नाही तसेच सदर डी.डी. (धनाकर्ष) मंजूरीसाठी ग्राहय धरणेत येणार नाही व त्यास अपात्र ठरविणेत येईल.

(e) सदर डी. डी. (धनाकर्ष ) ची मुदत निविदा भरणे तारखेपासून ३( तीन ) महिन्यापर्यंत राहील. सदर डी.डी. वर बँकेचा MIRC व IFC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

(f) पहिला लिफाफा उघडलेनंतर जर निविदाधारक अपात्र ठरला व त्यामूळे त्याचा दुसरा लिफाफा उघडणेत येणार नसलेने त्याचा डी.डी. (धनाकर्ष ) ७ दिवसामध्ये देणेत येईल. तसेच दुसरा लिफाफा

उघडलेनंतर ज्याचा नावे काम मंजूर होईल त्याचा व दुसरा क्रमांकाच्या कमी दराच्या निविदाधारकांचा डी.डी. (धनाकर्ष) दिवसामध्ये परत देणेत येईल. तसेच दुसरा क्रमांकच्या कमी दराच्या निविदा धारकाचा डी.डी. (धनाकर्ष) मंजूर मक्तेदारास कार्यारंभ आदेश दिले तारखेनंतर ३ दिवसामध्ये देणेत येईल.

(g) निविदा धारकाची सदर निविदा धारकाची बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन घेणेत येईल व त्याची नोंदणी १(एक) वर्षासाठी निलंबीत करणेत येईल. तसेच या व्यतीरिक्त कायाद्यानुसार इतर कायदेशीर कार्यवाही करणेत येईल.

(h) मंजूर मक्तेदारास डी.डी. (धनाकर्ष) बाबत पूर्ण शहानिशा (डी.डी (धनाकर्ष) ( Clearence व इतर बाबी ) झालेनंतर कार्यरंभ आदेश देणेत येईल.

(iv) काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निविदेतील तरतुदी प्रमाणे.

३५) सदर कामगिरीसाठी कामाचे मंजूर मक्तेदार यांनी त्यांचेकडे असलेल्या कामगारांचा भविष्य निर्वाह निधी स्वता: भरणेचा आहे. तसेच त्याची सर्व कागदपत्रे देयका सोबत या कार्यालयाकडे सादर करणेची आहेत.
३६) सदर अटी व शर्तीमुळे सुधारणा करणे , अटी शर्ती वाढविणे /कमी करणेचा अधिकारी मा.आयुक्तांना राहतील.
येणेप्रमाणे टेंडर शर्ती अटी असे.

वरील सर्व अटी शर्ती आम्हांस मान्य आहेत.

पुरवठादाराची सही

11·6·

**(आर.जी.रजपूत)**
**पाणी पुरवठा अभियंता**
**सां. मि. आणि कु.शहर महानगरपालिका**
**पाणी पुरवठा विभाग**